

# श्रीव्यंकटेश स्तोत्रम्

श्रीगणेशाय नमः । श्रीव्यंकटेशाय नमः ।

ॐ नमो जी हेरंबा ।सकळादि तूं प्रारंभा ।
आठवूनि तुझी स्वरुपशोभा । वंदन भावें करीतसे ॥ १ ॥
नमन माझे हंसवाहिनी । वाग्वरदे विलासिनी ।
ग्रंथ वदावया निरुपणी । भावार्थखाणी जयामाजी ॥ २ ॥
नमन माझे गुरुवर्या । प्रकाशरुपा तूं स्वामिया ।
स्फूर्ति द्यावी ग्रंथ वदावया । जेणें श्रोतया सुख वाटे ॥ ३ ॥
नमन माझे संतसज्जना । आणि योगियां मुनिजनां ।
सकळ श्रोतयां सज्जना । नमन माझे साष्टांगी ॥ ४ ॥
ग्रंथ ऐका प्रार्थनाशतक । महादोषासी दाहक ।
तोषूनियां वैकुंठनायक । मनोरथ पूर्ण करील ॥ ५ ॥
जयजयाजी व्यंकटरमणा । दयासागरा परिपूर्णा ।
परंज्योति प्रकाशगहना । करितों प्रार्थना श्रवण कीजे ॥ ६ ॥
जननीपरी त्वा पाळिलें । पितयापरी त्वां सांभाळिले ।
सकळ संकटापासूनि रक्षिलें । पूर्ण दिधलें प्रेमसुख ॥ ७ ॥
हें अलोलिक जरी मानावें । तरी जग हें सृजिलें आघवें ।
जनकजनीपण स्वभावें । सहज आलें अंगासी ॥ ८ ॥
दीनानाथा प्रेमासाठी । भक्त रक्षिले संकटी ।
प्रेम दिधलें अपूर्व गोष्टी । भजनासाठी भक्तांच्या ॥ ९ ॥
आतां परिसावी विज्ञापना । कृपाळुवा लक्ष्मीरमणा ।
मज घालोनी गर्भाधाना । अलौकिक रचना दाखविली ॥ १० ॥

तुज न जाणतां झालों कष्टी । आतां दृढ तुझे पायीं घातली मिठी ।
कृपाळुवा जगजेठी । अपराध पोटीं घालीं माझें ॥ ११ ॥
माझिया अपराधांच्या राशी । भेदोनि गेल्या गगनासी ।
दयावंता हृषीकेशी । आपुल्या ब्रीदासी सत्य करीं ॥ १२ ॥
पुत्राचे सहस्त्र अपराध । माता काय मानी तयाचा खेद ।
तेवीं तू कृपाळू गोविंद । मायबाप मजलागी ॥ १३ ॥
उदडांमाजी काळेगोरे । काय निवडावें निवडणारे ।
कुचलिया वृक्षांची फळें । मधुर कोठोनि असतील ॥ १४ ॥
अराटीलागीं मृदुला । कोठोनि असेल कृपावंता ।
पाषाणासी गुल्मलता । कैसियापरी फुटतील ॥ १५ ॥
आपादमस्तकावरी अन्यायी । परी तुझे पदरीं पडिलों पाहीं ।
आतां रक्षण नाना उपायीं । करणें तुज उचित ॥ १६ ॥
समर्थाचिये घरीचे श्र्वान । त्यासी सर्वही देती मान ।
तैसा तुज म्हणवितों दीन । हा अपमान कवणाचा ॥ १७ ॥
लक्ष्मी तुझे पायांतळी । आम्ही भिक्षेसी घालोनि झोळी ।
येणे तुझी ब्रीदावळी । कैसी राहील गोविंदा ॥ १८ ॥
कुबेर तुझा भांडारी । आम्हां फिरविसी दारोदारीं ।
यांत पुरुषार्थ मुरारी । काय तुजला पैं आला ॥ १९ ॥
द्रौपदीसी वस्त्रें अनंता । देत होतासी भाग्यवंता ।
आम्हांलागी कृपणता । कोठोनि आणिली गोविंदा ॥ २० ॥

मावेची करुनी द्रौपदी सती । अन्ने पुरविलीं मध्यरातीं ।
ऋषीश्र्वरांच्या बैसल्या पंक्ती । तृप्त केल्या क्षणमात्रें ॥ २१ ॥
अन्नासाठी दाही दिशा । आम्हा फिरविसी जगदिशा ।
कृपाळुवा परमपुरुषा । करुणा कैसी तुज न ये ॥ २२ ॥
अंगीकासा री या शिरोमणी । तुज प्रार्थितो मधुर वचनीं ।
अंगीकार केलिया झणीं । मज हातीचे न सोडावें ॥ २३ ॥
समुद्रे अंगीकारिला वडवानळ । तेणें अंतरी होतसे विव्हळ ।
ऐसें असोनि सर्वकाळ । अंतरी सांठविला तयानें ॥ २४ ॥
कूर्मे पृथ्वीचा घेतला भार । तेणे सोडिला नाहीं बडिवार ।
एवढा ब्रह्मांड गोळ थोर । त्याचा अंगीकार पै केला ॥ २५ ॥
शंकरे धरिलें हाळाहळा । तेणे नीळवर्ण झाला गळा ।
परी त्यागिले नाही गोपाळा । भक्तवत्सला गोविंदा ॥ २६ ॥
माझ्या अपराधांच्या परी । वर्णितां शिणली वैखरी ।
दुष्ट पतित दुराचारी । अधमाहूनि अधम ॥ २७ ॥
विषयासक्त मंदमति आळशी । कृपण कुव्यसनी मलिन मानसीं ।
सदा सर्वकाळ सज्जनांसी । द्रोह करी सर्वदा ॥ २८ ॥
वचनोक्ति नाहीं मधुर । अत्यंत जनासी निष्ठुर ।
सकळ पामरांमाजीं पामर । व्यर्थ बडिवार जगी वाजे ॥ २९ ॥
काम क्रोध मद मत्सर । हें शरीर त्यांचे बिढार ।
कामकल्पनेसी थोर । दृढ येथे केला असे ॥ ३० ॥

अठरा भार वनस्पतींची लेखणी । समुद्र भरला मषीकरुनी ।
माझे अवगुण लिहितां धरणीं । तरी लिहिले न जाती गोविंदा ॥ ३१ ॥
ऐसा पतित मी खरा । तरी तूं पतितपावन शारङ्गधरा ।
तुवां अंगीकार केलिया गदाधरा । कोण गुणदोष गणील ॥ ३२ ॥
नीचा रतली रायासीं । तिसी कोण म्हणेल दासी ।
लोह लागतां परिसासी । पूर्वस्थिती मग कैंची ॥ ३३ ॥
गांवीचे होते लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ ।
काकविष्ठेचे झाले पिंपळ । तयांसी निंद्य कोण म्हणे ॥ ३४ ॥

## ॥ इति श्रीव्यंकटेश स्तोत्रम् सम्पूर्ण ॥